# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.२११/२०२४/अहिल्यानगर मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| अॅड आण्णासाहेब मोहीनीराज जाधव,<br>रा.देशपांडे लेन,<br>मु.पो.नेवासा खुर्द, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर. | निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, नेवासा.<br>ता.नेवासा, जि.अहिल्यानगर. |

0 3 FEB 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## विवेचन

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.२११/२०२४/अहिल्यानगर संदर्भात दि.१६/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"आयोगाने द्वितीय अपिल क्र.१६५१/२०१९/अहिल्यानगर संदर्भात दि.२७/०६/२०२३ रोजी सुनावणीअंती दि.०१/०२/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी पालन केले नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसात आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा विहित मुदतीत आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे याप्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी."

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांनी आयोगाकडे अद्यापपर्यंत कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही.

३. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.१६५१/२०१९ संदर्भात दि.२७/०६/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांनी तक्रारदार यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणजेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केलेली नाही व आयोगाने तक्रार क्र.२११/२०२४ संदर्भात दि.१६/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणी दिलेल्या आदेशानुसार आयोगाकडे कोणताही लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य दिसून येत नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर (आयोगाने द्वितीय अपिल क्र.१६५१/२०१९ संदर्भात दि.२७/०६/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशावेळी कार्यरत) यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र)

शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत तक्रार क्र.२११/२०२४/अहिल्यानगर अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा ता.नेवासा, जि.अहिल्यानगर.

जा.क्र. ८८२ , दिनांक :- 03 FEB 2026